# बोरकरांच्या कविता : पर्यावरणीय समीक्षेच्या चष्म्यातून

- डॉ. नंदकुमार कामत

इको-क्रिटीसिजम म्हणजे पर्यावरणीय समीक्षेची परंपरा अमेरिकेत तिथल्या पर्यावरणीय चळवळींबरोबर उदयाला आली. जोझेफ मीकरचा पर्यावरणीय सौंदर्य शास्त्राचा शोध घेणारा 'द कॉमेडी ऑफ सर्व्हायव्हल' आणि अॅनेट कॉलॉनीचा 'द ले ऑफ द लँड' ह्या दोन ग्रंथांची खूप चर्चा झाली. त्यानंतर अनेक संकलित ग्रंथ आणि नियतकालीकांतील लेखांतून पर्यावरणीय समीक्षाशास्त्रासंबंधी वेधक लेखन प्रसिद्ध झाले. नेवाडा विद्यापीठाच्या शॅरील गलॉटफेल्टी आणि हॅरॉल्ड फ्रॉम ह्यांनी १९९६ साली 'द इकोक्रिटीसिजम रीडर- लँडमार्कस इन लिटररी इकॉलजी' हा ग्रंथ संपादित करून पर्यावरणीय समीक्षाशास्त्राची मूलतत्त्वे, रुपरेषा स्पष्ट केली. 'साहित्य आणि सभोवतालच्या भौतिक वातावरणातील परस्परसंबंधाचा अभ्यास म्हणजे पर्यावरणीय समीक्षा', अशी ह्या ग्रंथात सोपी व्याख्या केली आहे.

कार्डिनल स्ट्रीच कॉलेजचे थॉमस के. डीन ह्यांनी पर्यावरणीय समीक्षा म्हणजे नैसर्गिक विश्वाशी जोडलेल्या मानवी नात्यासंदर्भातील संस्कृती आणि सांस्कृतिक उत्पादनांचा अभ्यास असे म्हटले आहे. कार्ल क्रोबेरच्या इकॉलॉजीकल लिटररी क्रिटीसीइम (१९९४) ह्या पुस्तकांत इंग्लिश रंजनवादी कवितांची पर्यावरणीय समीक्षा आहे. अॅक्झेल गुडबॉडीनी जर्मन साहित्याची पर्यावरणीय समीक्षा करणाऱ्या लेखनाचा आढावा घेतला आहे. जर्मन भाषेच्या विद्यापीठीय- शिक्षकांच्या परिषदेपुढे त्यांनी एप्रिल १९९८ मध्ये हे व्याख्यान दिले होते. व्हर्जिनिया विद्यापीठाने २००१ साली 'बियाँड नेचर रायटींग; एक्सपाँडींग द बाउंडरीज ऑफ इकोक्रिटिसीजम्' हा कार्ला आर्मब्रस्टर व कॅथलीन वॉलेस यांनी संपादित केलेला ग्रंथ प्रकाशित केला. त्यात १९ व्या व २० व्या शतकातील साहित्याची पर्यावरणीय समीक्षा करणारे निबंध आहेत. २०व्या शतकातील अमेरिकन साहित्यातील पर्यावरणीय साहित्याची समीक्षा करणारे डॉनेल ड्रीस ह्यांचे, 'इकोक्रिटीसिजम् : क्रिएटींग सेल्फ अँड प्लेस इन एनव्हायरॉनमेंटल अँड अमेरिकन लिटरेचर' हे पुस्तक २००२ साली प्रसिद्ध झाले.

ह्या पाश्चिमात्य समीक्षेतिहासाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण समीक्षेचे मापदंड बा. भ. बोरकरांच्या कवितांना लावता येतील का ह्याचा प्राथमिक आढावा ह्या लेखात घेण्यात येत आहे. भविष्यात ह्याच पद्धतीचा विस्तार करण्याचा विचार आहे. पेशाने मी वैज्ञानिक आणि पर्यावरणशास्त्र हा विषय अध्यापन व संशोधनासाठी हाताळला असल्याने बोरकरांच्या कवितांतील पर्यावरणीय प्रतिमा, रुपबंध ओळखणे सोपे जाते.

बायरन, शेली, कीटस, टेनिसन ह्या ज्या इंग्रजी कवींचा बोरकरांनी उल्लेख केला आहे त्यांची पर्यावरणीय समीक्षाशास्त्राच्या दृष्टीकोनातून चर्चा झाली आहे. बोरकरांना लहानपणी त्यांच्या आजीने निसर्गाचा एक साक्षात्कार घडविला. 'सृष्टीतल्या चराचराला आपले दुःख समजते असे माझ्या मनाने घेतले' असे त्यांनी जे लिहिले आहे ते महत्वाचे आहे. कारण अशी एकतानता, तादात्म्य साधल्यावाचून पर्यावरणीय प्रतिमा अचूकपणे कवितेत उतरत नसतात. श्रावण हा बोरकरांचा आवडता ऋतू होता.

कारण ह्या ऋतूत पृथ्वी 'शाकंबरी' झालेली असते. पर्जन्य, पाणी आणि पालवी ह्यांचे संतुलन साधणारा हा ऋतु असतो.

बोरकरांच्या १० कवितासंग्रहांत मिळून विपुल पर्यावरणीय अनुभव घेता येतो. 'गिरीदरीतुनि झरे नव्हे हे हिरे, उसळती निळे/ ढगाढगाढगातुनि अन पाऱ्यापरी उन गळे कोवळे' (**श्रावणदर्शन**, आनंदभैरवी, १९५०) ह्या ओळीत एक उर्जानुभव आहे. श्रावणात भूजलाचे साठे तुडुंब झालेले असतात. त्यामुळे झऱ्यांच्या प्रवाहांना फार वेग असतो. त्यावर ऊन पडले की हे तुषार चमकू लागतात. पाऱ्यासारखे गळणारे कोवळे ऊन ही खास बोरकरी प्रतिमा. ही पाऱ्याची प्रतिमा इतर कवितांतही दिसते. खरं तर ही दृश्य प्रतिमा आहे. पारा एक द्रवरुप चकाकता धातु आहे. ऊन पाऱ्यासारखे गळणे म्हणजे बोरकरांना काय अभिप्रेत होते हे कळायला थोडेसे ऋतुमानाचे, हवामानाचे ज्ञान अवे. हा अभ्यास बोरकरांनी बालपणात केला असावा. श्रावणात एकसारखे उन असत नाही. सूर्याची किरणे राखाडी ढगांतून झिरपत असतात. त्यांना एक रुपेरी छटा असते. म्हणून ही पाऱ्याशी तुलना.

'घन नोहे हे पाणी' ही कविता चक्क जलसंवर्धनावर आहे. ढगांचे भौतिकशास्त्र बोरकरांनी ह्या कवितेत मांडले आहे. गोमंतकीयांच्या अस्मितेवर बरीच चर्चा झाली आहे. पण गोमंतकीयांची पर्यावरणीय ओळख काय हे समजायला 'माझ्या गोव्याच्या भूमीत', 'हिरवळ आणिक पाणी' आणि 'माझे घर' ह्या तीन कविता वाचाव्यात.

'मधाचे नारळ, दुधाचे घट, फळांचे पाझर, वनश्रीची कारागिरी, साळीचा भात, सोनकेवड्याचा हात, शुद्ध सौंदर्याचे वेद' बोरकरांना ज्या भूमीत सापडतात तिथे त्यांना चिरेबंदी घर हवे आहे. त्यांच्या यादीत 'विलायती वेल', 'प्राजक्ताचे खोड', 'नीरफणसाचे झाड', 'केळबन', 'गोठा', 'फुलझाडे', 'पोफळी', 'पानवेली', 'मिरवेली' आहेत. ही यादी म्हणजे गोमंतकीयांच्या ग्रामीण सौंदर्यवादी, उपयुक्ततावादी अभिरुचीचा काव्यात्मक सारांश आहे. बोरकरांची 'व्यवहारी' दृष्टी सुद्धा ह्या यादीत सापडते. व्यवहारी माणूसच पोफळीच्या आधाराने पानवेली, मिरवेली चढवील. प्रतिक्रिया, दुःखविरेचन (कॅथर्सिस) म्हणूनही बोरकर निसर्गाला शरण गेलेले दिसतात. संसाराच्या खस्ता व धबडग्यांतून उद्‌भवणाऱ्या विवंचनांवर मात करण्यासाठी बोरकरांनी आपल्या आजीचा वारसा उचललेला दिसतो. त्याची कबुलीही १९५० साली त्यांनी पुण्यात लिहिलेल्या 'वरिष्ठांची दरुत्तरे' ह्या कवितेत मिळते.

घावांवरच्या ह्या माशा झाडण्यात आयु सरे
सह्य केलेस निर्मून देवा, झाडें जनावरें
एका झाडाची ही छाया, एका पशूची ही माया
संसाराचे तापत्रय पुरे सुखाने सोसाया

पर्यावरणीय-समीक्षकांना चकित करणाऱ्या ह्या ओळी आहेत. कारण एका सर्जनशील कवीची तगमग, तडफड व कुटुंब असूनही पत्करलेले एकाकीपण, तुटलेपण, एकलेपण, 'सह्य केलेस निर्मून देवा, झाडें 'जनावरें' ह्या अगतिकतेचा अनादी आक्रोश करणाऱ्या ओळींतून प्रतिबिंबित झालेले आहे. झाडें आणि जनावरें नसती तर 'घाव' असह्य झाले असते असे बोरकरांना म्हणायचे आहे. ह्या कवितेचा

सांस्कृतिक भूगोल अभ्यासला तर पुण्याच्या त्यांच्या वास्तवात 'एका झाडाच्या' सावलीने आणि एका (पाळीव ?) 'पशूच्या माये'ने त्यांना साथ केली असावी असे दिसते. तुकारामबुवांनी 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे' हा जो अभंग लिहिला त्यातील 'येणे सुखे रुचे एकांताचा वास/ नाही गुण-दोष अंगा येत'. ह्या ओळींनां बोरकरांची सांसारीक अगतिकता समांतर जाते. रंजनवादी, सौंदर्यवादी काव्यावर पलायनवादाचा आरोप केला जातो. पण कवी निसर्गात का 'घुसतात', 'रममाण' होतात ह्याचा सूक्ष्म विचार आपल्याकडे झालेला नाही. बोरकर एक वेगळेच नाते निसर्गाशी जोडत गेले. त्यामुळे त्यांच्या काव्याला निव्वळ गेयताच नव्हे तर एक चित्रमय आकृतिबंध प्राप्त झाला. 'उदकावर खेळाव्या वाफा' सारखी कविता म्हणजे पर्यावरणीय दृश्य प्रतिमा सुदृढ, सुस्पष्ट करणारे शब्दचित्र आहे.

'उदकावर खेळाव्या वाफा, होड्यांच्या बदकांचा ताफा
रुप बघाया जरा झुकावा काठी अन् फुलता कुडचाफा
कळकबनाचा हिरवा शेपा धुसर क्षितिजी गर्द फुलावा
निळ्या गिरींतून अन् जास्वंदी लवलवणारा तुरा खुलावा'

उदक, वाफा, होड्या, बदके, कुडचाफा, कळकबन अशा स्वच्छ दृश्य प्रतिमांतून एक पर्यावरणीय मूड बोरकर तयार करतात. ही कविता अगदी कडक हिवाळ्यात ३० डिसेंबर १९६० रोजी त्यांनी पुण्याला लिहिली आहे. त्यामुळे 'उदकावर खेळणाऱ्या वाफांचा' आणि 'धूसर क्षितिजाचा' उलगडा व्हावा.

बांबू हे बोरकरांचे आवडते गवत असावे. बांबू, कळक ह्यांचे उल्लेख त्यांच्या कवितांत चपखल येतात. 'वन कळकांचे पिवळे/ गाळी पिकली सुकली पानें', ह्या ओळी जपानी 'हायकू' ह्या अल्पाक्षरी निसर्गकवितेप्रमाणे आहेत. 'कुणग्यांवरल्या गंजीवरती उजळाव्या सोन्याच्या लंका' ही अशीच एक चित्रमय ओळ. बोरकरांच्या ज्या गाजलेल्या निसर्गकविता आहेत त्यांचे हे एक वैशिष्ट्य आहे की त्यात एक-दोन ओळीत ते स्पष्ट पर्यावरणीय चौकट उभी करतात. पाऊस येणार आहे ना- त्याच्या पूर्वीच्या पर्यावरणीय 'मूड' कसा असतो? मोसमी पावसाची एक क्लिष्ट नैसर्गिक प्रक्रिया आणि कोसळण्यापूर्वीची ती ताणलेली, भारित अवस्था ह्यांचे प्रभावी चित्रण बोरकरांनी,

'झाडें झालीं निळीं निळीं, करांगुळीं गोवर्धन
धुंद आकाशच झालें, मंद अस्मानी पर्जन्य'

ह्या ओळींतून प्रभावीपणे केले आहे.

पर्यावरणीय घटकांचे मानुषीकरण 'माडाचे भावगीत' सारख्या कवितांतून बोरकरांनी केले आहे. असे मानुषीकरण करणे म्हणजे साहित्यिक 'परकाया प्रवेशा'चाच प्रकार असतो. मेघाचे दूतरुपी मानुषीकरण करणाऱ्या 'मेघदूत' कार महाकवी कालीदासाची परंपरा बोरकरांनी पुढे चालविलेली आहे. कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत' ही कविता उगीचच बोरकरांना आवडली नव्हती. ती त्यांच्या काव्यस्वभावाला भिडणारी होती.

एखाद्या स्थानाचे, स्थलाचे पर्यावरणीय सूक्ष्म वर्णन करायचे असेल तर ठळक घटक व त्यांचा परस्पर संबंध ज्ञात हवा. बोरकरांची 'हीच हीच ती सागरवेळा' ही काहीशी चुटपूट, हूरहूर लावणारी

कविता आहे. त्यात त्यांची कांही पर्यावरणीय निरीक्षणे अचूक आली आहेत.

बसू गोल ह्या ढगासारख्या
फुरशासम वेलींनी भरल्या
नरम वाळूंच्या थिट्या ढिगावर
माडांच्या झावळ-छायांनी
जया घातले कोमल कुंपण

इथे बोरकरांनी गोव्याच्या किनाऱ्यावरील आजकाल उध्वस्त होऊ घातलेल्या वाळुच्या टेकड्यांचे सौंदर्य वर्णिले आहे. सँड ड्यून हा एक पर्यावरणीय संरक्षणाचा विषय आहे. पण 'गोल ढगासारखा तो नरम वाळूचा थिटा ढिग', म्हणणारे बोरक, 'कोमल-कुंपण' ही विसरत नाहीत.

पाश्चिमात्य पर्यावरणीय समीक्षाशास्त्राच्या दृष्टीकोनातून बोरकी कवितेचे मूल्यपान करता येणे शक्य आहे. त्यासाठी काही निवडक निसर्गकविता घेऊन त्यांचा विचार व्हायला हवा. बोरकरांनी आपल्याला भरभरून दिले आहे. 'संसाराचे तापत्रय सुखाने सोसायला' निसर्ग, पर्यावरणाला जवळ करणाऱ्या ह्या कवीला पर्यावरणीय समीक्षा शास्त्राद्वारे न्याय देण्याचा प्रयत्न भविष्यात मी करू इच्छितो.

* * *